# प्रेसनोट दि. ११/०४/२०१९

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन नऱ्हे गांवातील फ्लॅटमध्ये व विमाननगर मधील स्पा मध्ये छापा टाकुन १ अल्पवयीन व १ सज्ञान महाराष्ट्रीन मुलीची व थायलंड देशातील ३ मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन चार आरोपी अटक

**कारवाई नं. -१**

दि.१०/०४/२०१९ रोजी मा.भानुप्रताप बर्गे सपोआ गुन्हे -२ यांना विमाननगर परिसरातील जॉगिंगपार्क जवळील **टॅन्सी वेलनेस स्पा, ए/२, पेशवा कॉम्पलेक्स विमाननगर** पुणे येथे स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवयाय चालत असले बाबत माहिती मिळाल्याने त्यांचे दिमतीत व मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे,म.सहा.पोलीस निरी.अश्विीनी जगताप,पो.उपनिरी श्री व्यवहारे, ज्ञानेश्वर देवकर,राजेंद्र ननावरे, व विमाननगर पोलीस स्टेशन कडील वपोनि श्री राजेंद्र पाटील व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.

छापा कारवाई करुन तेथुन **थायलंड देशातील तीन मुलींची** वेश्याव्यवायातुन सुटका करुन इसम नामे नामे रंजनकुमार राजकिशोर पासस्वान व २. पाहिजे आरोपी गौतम घाडगे यांचे विरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे भादवि कलम ३७० , ३७० (अ) व पिटा ॲक्ट कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कारवाई नं. – २**

दि.१०/०४/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नरेश बलसाने यांचे कडुन स नं ३७/२,पारीख कंपनीजवळ,न-हेगाव ता. हेवली जि पुणे या ठिकाणी मुलींना बोलावुन घेवुन त्यांना पैशाचे आमीष दाखवुन त्यांच्याकडे गि-हाईक पाठवुन त्यांच्याकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे सपोनि अनिता खेडकर, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, नरेश बलसाने, राजेद्र कचरे, गितांजली जाधव, कविता नलावडे, रुपाली चांदगुडे यांनी व सिंहगडरोड पोलीस स्टेशनकडील पोनि (गुन्हे) श्री.क्रांतीकुमार पाटील यांनी संयुक्त कारवाई करून बीएम कॉँपलेक्स, फ्लॅट नंबर ३०१, स नं ३७/२,पारीख कंपनीजवळ, न-हेगाव ता. हवेली जि पुणे या फ्लॅटमध्ये येथे वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान महाराष्ट्रातील १ अल्पवयीन व १ सज्ञान मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे.

त्यांना वेश्या व्यवसायास लावणारे १) ललिता विशाल चौधरी, वय २८ वर्षे रा. सदर, २) रुपाली संतोष आवटे वय ३३ वर्षे रा. जेएसपी कॉलेज चौक, न-हे ता हवेली जि पणे, ३) मांगीलाल पिराराम चौधरी वय ३१ वर्षे रा. मुळगाव खोड ता. व जि. पाली राजस्थान राज्य याचे विरुध्द सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे येथे पिटा ॲक्ट कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा.भानुप्रताप बर्गे सो सपोआ गुन्हे शाखा -२ यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी वरील दोन्ही कारवाया केल्या आहेत.